दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ९७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 28 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 97 | Pages 4 | Rate 4 Rs

### सिडकोच्या भूखंड घोटाळ्याची चौकशी होणार

**मुंबई**–राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणाऱ्या ४ हजार ५०० कोटी रुपयांच्या कथित सिडको जमीन घोटाळा प्रकरणी राज्य सरकारने आता मोठी कारवाई सुरू केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सिडकोचे तत्कालीन प्रमुख आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपांची दखल घेत सरकारने चौकशीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.आमदार रोहित पवार यांनी विधिमंडळ अधिवेशनात आणि बाहेरही सातत्याने हा मुद्दा लावून धरला होता. सिडकोचे तत्कालीन प्रमुख पदावर असताना संजय शिरसाट यांनी आपल्या पदाचा गैरवापर केला आणि यशवंत बिवलकर यांना तब्बल ४ हजार ५०० कोटी रुपये किमतीची सिडकोची जमीन नियमबाह्य पद्धतीने दिल्याचा आरोप रोहित पवारांनी केला होता.

# बीड जिल्ह्याच्या इतिहासात पहिली बार ; खासदारांचा दौरा दारोदार

## बीड जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच खासदारांचा दारोदार दौरा; परळीतील सर्व प्रभाग पिंजून काढत राष्ट्रवादी–शरदचंद्र पवार गटाची ताकद दाखवली



दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या तोंडावर राजकीय वातावरण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार साहेब गटाने आज परळी शहरात प्रचंड शक्तीप्रदर्शन करत ऐतिहासिक प्रचार फेरी आयोजित केली. प्रभाग क्रमांक ५, १६, ४, ६, १५ आणि २ मध्ये उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या या भव्य फेरीत पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बीड जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच खासदारांनी स्वतः प्रत्येक प्रभागात जाऊन घराघरांत भेट देत दारोदार प्रचार केला, यामुळे संपूर्ण जिल्ह्यात ही प्रचार मोहीम मोठी चर्चा ठरली. शहरातील मुख्य रस्त्यांपासून गल्लीबोळांपर्यंत सुरू असलेल्या या जनसंपर्क दौऱ्यात नागरिकांनी उमेदवारांचे मनापासून स्वागत केले.

**नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; परिवर्तनाची चाहूल**

प्रचारादरम्यान उमेदवार आणि पक्षनेत्यांनी मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधला. नागरिकांनी मांडलेल्या तक्रारी, अपेक्षा आणि प्रश्नांवर पक्षाने सकारात्मक चर्चा केली. शहरातील सर्व स्तरातील नागरिकांकडून मिळालेला उत्साहवर्धक प्रतिसाद हेच दर्शवत आहे की परळीमध्ये बदलाची तीव्र मागणी निर्माण झाली आहे. लोकांनी स्पष्टपणे व्यक्त केले की विद्यमान पुढाऱ्यांच्या दबावशाही, गैरव्यवस्थापन आणि विकासकामांतील अडथळ्यांमुळे ते कंटाळले आहेत. पारदर्शक प्रशासन, न्याय्य नेतृत्व आणि शहराचा सर्वांगीण विकास या तीन मुख्य मुद्द्यांसाठी नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार गटावर विश्वास दाखवला आहे.

**परळीतील प्रभाग काढले पिंजून**

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाजूने जनसमर्थनाची लाट**

शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वावरील प्रचंड विश्वासामुळे राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार गटाला परळीत अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, वातावरण पक्षाच्या बाजूने झुकलेले दिसत आहे. प्रभागांमध्ये उमेदवारांना मिळणारा लोकस्नेह आणि वाढता जनआशीर्वाद पाहता विजयाची समीकरणे मजबुत झाली असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

**रमेश गायकवाड यांचा जाहीर प्रवेश पक्षाला नवी ऊर्जा**

आजच्या प्रचार फेरीत एक महत्त्वपूर्ण राजकीय घटना घडली.भारतीय जनता पक्षाच्या दलित आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष श्री. रमेश गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. सामाजिक न्याय, समता आणि प्रगत विचारसरणीवर विश्वास ठेवून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. पक्षात त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यांच्या प्रवेशामुळे परळीतील पक्ष संघटन अधिक बळकट होणार असून दलित व वंचित घटकांचा पक्षाकडे ओढा वाढणार, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

**परळीच्या राजकारणात नवा मोड?**

आजच्या उत्साहपूर्ण फेरीमुळे परळी शहरात निवडणुकीची दिशा बदलत असल्याचे ठळकपणे दिसून आले.दारोदार जनसंपर्क, सर्व प्रभागांतील प्रबळ उपस्थिती आणि जनतेकडून मिळणारा अभूतपूर्व प्रतिसाद यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढत आहे. एकूणच, परळी शहरात परिवर्तनाची हवा जोरात वाहू लागली असून, आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार गट विजयी होण्याची शक्यता अधिकाधिक बळावत आहे.

## डॉ.जोशी सर यांना पीएचडी प्रधान

दैनिक वादळ वार्ता

**नायगांव । हानुमंत चंदनकर**



नांदेडच्या नायगाव शहरातील दत्त जुनिअर कॉलेज नायगाव चे प्राध्यापक तथा मिलेनियम पब्लिक स्कूलचे मॅनेजमेंट हेड व तसेच श्री भगवान बालाजी मंदिर नरसी येथील संचालक धार्मिक समिती प्रमुख डॉ ज्ञानेश्वर वासुदेव महाराज जोशी कोलंबीकर आज दिनांक २६ नोव्हेंबर रोजी कहाळा येथे गाथा मूर्ती सद्गुरु श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर व गुरुवर्य निळकंठ महाराज कहाळेकर यांच्या शुभहस्ते काशी येथील विश्व विद्यापीठाच्या अंतर्गत जोशी सर यांना पीएचडी प्रदान करण्यात आली सदर डिग्री सद्गुरु श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर व अन्य गुरुवरांच्या उपस्थित डिग्री प्रदान करण्यात आली यावेळी अनेक गुरुवर्य मंहत वैदिक वारकरी अभ्यासक अनेक ज्येष्ठ साहित्यिक यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथे संविधान दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभातफेरीने झाली. विद्यार्थ्यांनी हातात फलक व घोषवाक्ये–संविधानाची हिच ग्वाही , उच्च निच्च कोन्ही नाही.ओरडरने कि क्या बात है !संविधान हमारे साथ है. !! संविधानाने दिला मान, स्त्री पुरुष एक समान .अशा घोषणा देत निघाली प्रभात फेरी घेऊन मुख्य रस्त्यावरून भव्य रॅली काढत गावात संविधान दिनाची



जनजागृती केली.यानंतर शाळेत आयोजित कार्यक्रमात संविधानाचे महत्व, त्यातील मूलभूत हक्क–कर्तव्ये व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान याबाबत विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आपली भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी संविधान रक्षणाची शपथही घेतली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. बी. कलणे होते. सहशिक्षक श्री. एच. एन. मोरे यांनी संविधान मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. गावातील नागरिक माजी सरपंच –चांदोबा एडके, यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत संविधानाबद्दल जनजागृतीचे महत्व स्पष्ट केले. तसेच शालेय पोषण आहार स्वयंपाकी ताई , मदतनिस व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.संविधान दिनानिमित्त घेतलेल्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांविषयी जागरूकता निर्माण झाली असून उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

## प्रभाग १२ मध्ये लताताई वाघमारे व सय्यद तौफिक यांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**



माजलगाव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक १२ मधील तुतारीचे अधिकृत उमेदवार लताताई श्रीहरी वाघमारे व सय्यद तौफिक यांच्या प्रचाराचा भव्य शुभारंभ झाला. सुरुवातीपासूनच प्रचार रॅलीला प्रभागातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने वातावरण निवडणूकसर झालं.

सामाजिक आणि राजकीय कार्यात सतत सक्रिय राहून अनेक आंदोलने, उपोषणे, मोर्चे काढत जनतेच्या प्रश्नांसाठी लढा देणाऱ्या या दोन्ही उमेदवारांना प्रभागात चांगलं जनसमर्थन मिळत असल्याचं चित्र दिसत आहे. बहुजन समाजाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणारे हे दोन्ही उमेदवार तुतारी – राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या अधिकृत निशाणीवर निवडणूक रिंगणात उतरले आहेत. प्रचार रॅलीत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व विधानसभा नेते मोहनराव जगताप, तसेच कचरू तात्या खळगे, सहाल चाऊस, संतोष यादव, विश्वंभर थावरे, बिलाल चाऊस, रूपचंद कांबळे, ताराचंद राठोड, वैजनाथ चव्हाण, मधुकर साळवे, अशोक जाधव आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली. उमेदवारांसोबत प्रभागातील महिला–पुरुष नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. भीमनगर येथे आयोजित कॉर्नर मीटिंगमध्ये नागरिकांकडून उमेदवारांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. बैठकीत प्रभागातील मूलभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. या ठिकाणी उमेदवारांनी– तसेच महत्वाच्या सामाजिक समस्या निराकरणासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. बैठकीदरम्यान नागरिकांचा उत्साह अक्षरशः ओसंडून वाहत होता. संपूर्ण प्रभागातून तुतारी या चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत असून निवडणुकीत या जोडीला भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## नंदुरबार–प्रकाशा पूल: ऊस वाहतुकीच्या गर्दीत ट्रॅक्टर, रिक्षा आणि टेम्पोचा भीषण अपघात! वाहतूक विस्कळीत

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशा येथे जुना पूल आणि नुकताच सुरू झालेला नवीन पूल दोन्ही कार्यरत असतानाही, उत्तर भागातून आलेल्या ऊस वाहतुकीच्या मोठ्या दबावामुळे आज (दिनांक २६ नोव्हेंबर २०२५) सकाळी एक मोठा अपघात झाला. स्थानिक आयान शुगर तसेच इतर कारखाने आणि खांडसरींसाठी या मार्गावर मोठ्या प्रमाणात ऊसतोड सुरू असून, दररोज शेकडो ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर याच पुलावरून ये–जा करत आहेत. यामुळे नवीन पूलदेखील ऊस वाहतुकीसाठी कमी पडत असल्याचे चित्र आहे.दिनांक २६ रोजी सकाळी ८ वाजून ३० मिनिटांनी ऊस वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर, एक पे रिक्षा आणि एक टेम्पो यांच्यात



हा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका गंभीर होता की यामध्ये पे रिक्षा आणि टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे.

अपघातानंतर तातडीने प्रत्यक्षदर्शींनी मदतकार्य सुरू केले असून, सध्या अपघातग्रस्त वाहनांना बाजूला सरकवण्याचे काम सुरू आहे, ज्यामुळे वाहतूक पुन्हा सुरळीत करता येईल. या घटनेची माहिती मिळाल्यावर तातडीने पोलिसांना पाचारण करण्यात आले असून, पोलीस या अपघाताचा पंचनामा करत आहेत.

सध्या या अपघातामुळे पुलावरील वाहतूक काही प्रमाणात विस्कळीत झाली आहे. ऊस वाहतुकीच्या वाढत्या प्रमाणामुळे या मार्गावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

संपादकीय

## अयोध्येवर भगव्याची शोभा

आजु सफल तपु तीरथ त्यागू, आजु सफल जप जोग बिरागू, सफल सकल सुभ साधन साजू, राम तुम्हहि अवलोकत आजू...अनेक शतकांपासूनच्या या अंतर्गत भावना प्रत्यक्षात समोर आल्या. तपश्चर्येला फळ मिळाले, मन प्रसन्न झाले, श्रद्धा पूर्ण झाली. श्री अयोध्या धाम येथील श्रीराम जन्मभूमी मंदिरावर झालेला ध्वजारोहण सोहळा मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचा उत्सव साजरा करतो, तसेच भारतीयांची श्रद्धा, देशभक्ती आणि सांस्कृतिक मूल्यांची घोषणा आहे. हा क्षण ऐतिहासिक आहे. दीर्घकाळापासून जपलेला संकल्प आता प्रत्यक्ष वास्तुकलेत रूपांतरित झाला. लाखो भक्तांचे स्वप्न आज पूर्ण झाले. ज्यात तपश्चर्या, त्यागाची भावना सामावलेली आहे.इतिहासात अनेक संघर्ष, साम्राज्यांचे उदय, तसेच साम्राज्ये लोप पावली. श्रीरामाच्या जन्मस्थानासाठी केलेला प्रयत्न न्यायासाठी असण्यासोबत देशाच्या अस्मितेला पुन्हा जागृत करण्यासाठी होता. या शतकानुशतके चाललेल्या प्रयत्नात समाजातील प्रत्येक घटक सामील होता. संन्यासी, संत, पुरोहित, नागा, निहंग, विद्वान, विचारवंत, सामान्य कुटुंब आणि जंगल व गुहांमधील साधक या सर्वांनी जात, पंथ आणि उपासना पद्धतीच्या रेषा ओलांडून स्वतःला प्रभू श्रीरामांच्या चरणी समर्पित केले. अयोध्या धाममध्ये मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाच्या या भव्य मंदिरावर झालेल्या ध्वजारोहण सोहळ्यामधून दीर्घकाळ जोपासलेली भक्ती, संयमी संघर्ष आणि सामूहिक श्रद्धा दिसून येते. विवाह पंचमीचा हा दैवी योग या उत्सवाला आणखी पवित्र करतो. श्रीराम आणि माता जानकी यांचा विवाह झालेला मार्गशीर्ष शुद्ध पंचमी हा दिवस विवाह सोहळा आणि धर्म व निसर्गाच्या समन्वयाचे प्रतीक आहे. हा ध्वजारोहण सोहळा परंपरेला प्रबळ करतो आणि कालातीत संदेश देतो की धर्माचा नेहमी विजयी होतो आणि रामराज्याची तत्त्वे कायम टिकून राहतात. महर्षी वाल्मिकींनी रामायणात म्हटल्याप्रमाणे, 'रामो विग्रहवान धर्म' म्हणजेच प्रभू श्रीराम हे धर्माचे अवतार आहेत. हा ध्वजारोहण फक्त विधी किंवा उत्सव नाही तर ऐतिहासिक टप्पा आहे, जेथे हजारो वर्षांची सांस्कृतिक स्मृती, दशकांपासून न्यायासाठीचा संघर्ष, संतांचे तप, भक्तांचे धैर्य व राष्ट्राचा सामूहिक उत्साह एकत्र येऊन सत्याचा विजय साकारला आहे, धर्माला नवसंजीवनी दिली आहे आणि प्रभू श्रीरामाच्या जन्मस्थानी भव्य मंदिर उभारले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम लल्लाच्या भव्य प्राणप्रतिष्ठेपासून अयोध्येने जागतिक स्तरावरून अभूतपूर्व लक्ष वेधले आहे. एका वर्षापेक्षा कमी कालावधीत भारत आणि परदेशातून एक कोटीहून अधिक भाविकांनी व पर्यटकांनी अयोध्येला भेट दिली. हॉटेल्स आणि धर्मशाळा पूर्णपणे भरलेल्या आहेत आणि नवीन रोजगार व व्यवसायाच्या संधींच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये जलद वाढ होत आहे. अयोध्या आता श्रद्धेचा आणि आर्थिक विकासाचा सुसंवादी संगम साधत जागतिक सांस्कृतिक राजधानी ठरले. पंतप्रधानांच्या दूरदर्शी मार्गदर्शनाखाली अयोध्येची त्रेता युगाप्रमाणे म्हणजेच दिव्य, भव्य आणि अभिनव अशी तुलना केली जात आहे. रस्ते, घाट, मार्ग, सुरक्षा व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यात आला आणि त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ, रामपथ, धर्मपथ, भक्तिपथ, जन्मभूमी पथ आणि सरयू नदीच्या किनाऱ्याचे संवर्धन हे या परिवर्तनाचे आधारस्तंभ बनले आहेत. जवळपास ५०,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांमुळे अयोध्येचा कायापालट होत आहे. मोक्षाचे हे शहर आता जगातील पहिले स्मार्ट आध्यात्मिक शहर म्हणून रूपांतरित केले जात आहे. लवकरच सुरू होणारे म्युझियम ऑन टेम्पल्स अयोध्येच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला जागतिक शिक्षण केंद्रात रूपांतरित करेल. १,४०७ एकर जगेवरील नवीन अयोध्या ग्रीनफिल्ड टाऊनशिपमध्ये २०० एकर हरित जागा, सुपर-स्पेशलिटी आरोग्य केंद्र, भूमिगत उपयुक्तता यंत्रणा आणि वेलनेस हबचा समावेश आहे, जे शहराला भावी स्थिर, पर्यावरणपूरक आध्यात्मिक महानगर म्हणून आकार देत आहे. चाळीस मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प अयोध्येमधील ऊर्जेच्या गरजांची पूर्तता करत आहे. प्रभू श्रीरामाचे व्हर्च्युअल दर्शन, मेटाव्हर्स अनुभव, वैदिक वन आणि हवामान-आधारित व्यवस्थापन यंत्रणा शहराची ओळख अधिक वाढवत आहे. श्रद्धा, संशोधन, संस्कृती, तंत्रज्ञान आणि दूरदर्शी दृष्टिकोन यांना एकत्र करून अयोध्या पवित्र शहर तसेच जागतिक वारसा स्थळ म्हणून देखील उदयास येत आहे. जगातील हा पहिला धार्मिक बांधकाम प्रकल्प आहे, ज्याला ब्रिटिश सेफ्टी कौन्सिलकडून 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' आणि भारताच्या नॅशनल सेफ्टी कॉन्सिलकडून सर्वोच्च सुरक्षा पुरस्कार मिळाला आहे. यामधून निदर्शनास येते की, श्रद्धा आणि भक्तीसोबत जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकी आणि सुरक्षा मानकांचे पालन करण्यात आले आहे. मंदिर संकुल २.७ एकर जागेवर पसरलेले आहे, ज्यामध्ये सुमारे ५७,४०० चौरस फुटांचे बांधकाम क्षेत्र आहे. मंदिराची लांबी ३६० फूट, रुंदी २३५ फूट आणि उंची १६१ फूट आहे. या तीन मजली मंदिरात २० फूट उंचीचे मजले, ३६६ बारकाईने कोरीव काम केलेले स्तंभ (खांब), पाच मंडप, १२ भव्य प्रवेशद्वार आणि अतुलनीय कारागिरीची साक्ष देणारी विशिष्ट नागर-शैलीतील वास्तुकला आहे. मंदिराच्या तळमजल्यावर बालकराम यांचे दर्शन मिळते, तर पहिल्या मजल्यावर श्रीराम दरबारचे दिव्य दृश्य पाहायला मिळते. मंदिराच्या तटबंदीमध्ये शेषावतार मंदिर, संत तुळसीदास मंदिर, जटायू आणि खारीचे पुतळे आहेत, तर सप्त मंडपामध्ये महर्षी वसिष्ठ, महर्षी विश्वामित्र, महर्षी वाल्मिकी, अगस्त्य मुनी, निषादराज, माता शबरी आणि माता अहिल्या आहेत. विनासायास आध्यात्मिक अनुभव मिळण्याच्या खात्रीसाठी भक्त-केंद्रित सुविधा काळजीपूर्वक डिझाइन करण्यात आल्या आहेत. प्रभू श्रीरामाचे राज्य धार्मिक आदर्श असण्यासोबत त्यामधून मानवता आणि अनुशासन दिसून येते. राज्याचा आधार न्याय आहे, भीती नाही आणि राष्ट्रासाठी शासक नाही तर जनता महत्त्वाची आहे. रामराज्याची ही भावना आजही समाज, धोरणे आणि देशाच्या चारित्र्याला मार्गदर्शन करत आहे. हे मंदिर फक्त दगडी बांधकाम नाही तर त्यामध्ये भक्तांचे संघर्ष, संतांचे तप आणि समाजाचे समर्पण सामावलेले आहे. अयोध्या आता फक्त तीर्थक्षेत्र राहिलेले नाही, तर उत्साहाचे केंद्र बनले आहे. श्रीराम आता फक्त स्मरणीय नाहीत, तर अनुभव आहेत. भारत आता फक्त राष्ट्र नाही, तर राम-केंद्रित संस्कृतीचे जागृत रूप आहे. प्रभू श्रीराम यांनी दाखवलेली कर्तव्यनिष्ठता, देशभक्ती, चारित्र्य आणि नीतिमत्ता या आदर्शांपासून प्रेरणा घेत राहिल्यास मानवी संस्कृती अधिक समृद्ध होईल. हे मंदिर भक्तीचे केंद्र असण्यासोबत जीवनाचा दीपस्तंभ आहे, जो भावी पिढ्यांना आठवण करून देतो की धर्म केवळ उपासनेचा विधी नाही, तर आचरणाचा दृष्टिकोन आणि समाजाचा आधार आहे.

# विधान परिषदेचा अवमान केल्याबद्दल सूर्यकांत मोरे यांच्यावर विशेषाधिकार भंगाची कारवाई करा

## भाजपा आ.प्रवीण दरेकर, आ.श्रीकांत भारतीय यांची विधीमंडळाकडे मागणी

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

विधान परिषद, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच विधान परिषद सदस्यांबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल शरद पवार गटाचे कार्यकर्ते सूर्यकांत मोरे यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची कारवाई करावी, अशी मागणी आपण व आ. श्रीकांत भारतीय यांनी विधीमंडळाकडे केली आहे, अशी माहिती भाजपाचे विधान परिषदेतील गटनेते व गृहनिर्माण स्वयं समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. दरेकर बोलत होते. भाजपाचे ज्येष्ठ नेते आ. श्रीकांत भारतीय, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी यावेळी उपस्थित होते. आ. दरेकर यांनी सांगितले की, २३ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड नगरपरिषदेच्या निवडणूक प्रचार सभेत बोलताना सूर्यकांत मोरे यांनी विधान परिषद, विधान परिषदेचे सदस्य व परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्याबद्दल अत्यंत अवमानकारक भाषेत वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे विधान परिषदेची अप्रतिष्ठा झाली असल्यामुळे मोरे यांच्यावर विशेषाधिकार भंगाची कारवाई करण्याची आवश्यकता आहे. मोरे यांनी विधीमंडळाचे वरिष्ठ



सभागृह विधान परिषदेचा तसेच प्रत्येक विधान परिषद सदस्याचा अपमान केला आहे. सूर्यकांत मोरे यांनी विधान परिषदेचे सर्व सदस्य, सभापती, विधान परिषदेबद्दल असत्य, दिशाभूल करणारी माहिती देत सभागृहाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवला आहे. यामुळे सभागृहाची प्रतिष्ठा, विश्वासार्हता, स्वायत्तता धोक्यात आली आहे. संविधान कलम १९४ नुसार राज्य विधानमंडळ व त्यांचे सदस्य यांना विशेषाधिकार व स्वातंत्र्य प्रदान केले आहे. सभागृहाची प्रतिष्ठा कमी करणारी कोणतीही कृती जर सभागृहाच्या कामकाजावर परिणाम करत असेल तर ती कृती विशेषाधिकार भंग कृती ठरते. मोरे यांच्यावर विशेषाधिकार भंग केल्याबद्दल कारवाई व्हावी, असे आ. दरेकर यांनी नमूद केले. श्री. मोरे यांचे भाषण चालू असताना आ. रोहित पवार हे हसत होते, असेही आ. दरेकर यांनी निदर्शनास आणून दिले. आ. दरेकर म्हणाले की, मोरे यांच्या पक्षाचे प्रमुख शरद पवार हे विधान परिषदेचे १९९३ -१९९६ दरम्यान सदस्य तर १९९५ ते १९९६ विरोधी पक्ष नेते होते. सुप्रिया सुळे ही २००६-०९ राज्यसभा सभासद होत्या. उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण देखील विधान परिषदेचे सभासद आहेत आणि होते. शप राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे देखील विधान परिषदेचे सदस्य आहेत. मोरे यांनी ज्या हीन भाषेत प्रा. शिंदे यांच्यावर अवमानकारक टिप्पणी केली ती टिप्पणी श्री. पवार, सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदे, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण यांनाही लागू होते का असा परखड सवाल आ. दरेकर यांनी केला. राज्यसभेचे प्रतिरूप म्हणून विधान परिषद सभागृह कार्यरत असते. संविधान निर्मात्यांनी विधान परिषदेची निर्मिती केली आहे. विधान परिषद सदस्य म्हणजे उडालेले बल्ब अशी अवहेलना दुर्दैवी बाब आहे. ही शेरेबाजी अमृत महोत्सवी वाटचाल पूर्ण केलेल्या भारतीय राज्यघटनेचा घोर अवमान करणारी आहे असेही त्यांनी नमूद केले.

**हरलेल्या मनाचे मविआ नेते रडीचा डाव खेळत आहेत**

मविआ नेत्यांचा विश्वास ढासळला आहे. त्यांची निवडणुकीच्या मैदानात येऊन लढण्याची ना उमेद आहे ना धमक आहे. महायुतीचा कारभार स्वच्छ पारदर्शक असल्याने टीका करायलाही वाव नाही. अशा स्थितीत मविआ नेते रडीचा डाव खेळत आहेत. भाजपावर विश्वास असल्याने १०० ठिकाणी बिनविरोध नगरसेवकांची निवड झाली त्यामुळे पायाखालची जमीन सरकली आहे. त्यामुळे गंभीर आरोप करत नवनवीन रडण्याचे डाव खेळत आहेत अशी टीकाही आ. दरेकर यांनी केली.

# 'हा' योग्य टोनर निवडा आणि चेहऱ्यावरील काळे डाग आणि पिगमेंटेशनला करा बाय-बाय

**दैनिक वादळ वार्ता**

बाजारात अनेक प्रकारचे फेस टोनर मिळतात पण काही असे टोनर आहेत ते केमिकलयुक्त असतात, ज्याच्या वापराने तुम्हाला लगेच फरक दिसतो मात्र काळांतराने मात्र त्वचेच्या समस्या निर्माण होऊ लागतात. त्यामुळे एकेकाळी लोकं फेस टोनर वापरणे टाळत असत कारण ते अल्कोहोल बेस्ड होते. परंतु आता हेच फेस टोनर लोकांच्या त्वचेची काळजी घेण्याच्या दिनचर्येचा अविभाज्य भाग बनले आहे. कारण अल्कोहोल बेस्ड टोनर न वापरता बाजारात उपलब्ध असलेले पाणी बेस्ड आणि नैसर्गिक घटकांचे फेस टोनर सर्वोत्तम आहे. तर हे फेस टोनर त्वचेला उजळवते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करते. या लेखात फेशियल टोनर कसे लावायचे आणि तुमच्यासाठी सर्वोत्तम टोनर कसा निवडायचा हे आपण आजच्या लेखात जाणून घेऊयात



**फेशियल टोनर म्हणजे काय?**

हे सामान्यतः पाण्यावर आधारित लोशन किंवा टॉनिक असते जे चेहरा स्वच्छ केल्यानंतर आणि मॉइश्चरायझर वापरण्यापूर्वी लावले जाते. जरी हे प्रोडक्ट वॉटर बेस्ड सारखे वाटत असले तरी ते त्वचेला शांत करते आणि मॉइश्चरायझ करते.

टोनर त्वचेवर कशा प्रकारे कार्य करतो?

चेहऱ्यावरील घाण साफ करते.

त्वचेला आर्द्रता देते.

इतर स्किन केअर प्रोडक्ट त्वचेत सहजपणे शोषली जातात.

त्वचेचे पीएच संतुलन पुन्हा नव्यासारखे करण्यास मदत करते.

**स्वतःसाठी टोनर कसा निवडावा?**

मुरुमांच्या त्वचेसाठी: अल्फा हायड्रॉक्सी सिड आणि बीटा हायड्रॉक्सी सिड असलेले टोनर वापरणे सर्वोत्तम ठरेल. काही टोनरमध्ये सॅलिसिलिक सिड असते , जे हायपरपिग्मेंटेशन आणि ऑइल कंट्रोलसाठी चांगले मानले जाते.

संवेदनशील त्वचेसाठी : जर तुम्हाला त्वचेशी संबंधित काही समस्या असतील, तर जास्त सुगंध, डाई आणि प्रीजरव्हेटिव असलेले टोनर वापरणे टाळा.

प्रौढ त्वचेसाठी: व्हिटॅमिन सी आणि फेरुलिक सिड सारखे अँटीऑक्सिडंट्स असलेले टोनर फायदेशीर ठरू शकतात. मॉइश्चरायझिंग हायल्यूरॉनिक सिड आणि ग्लिसरीन असलेले टोनर वापरल्याने देखील या प्रकारच्या त्वचेला फायदा होऊ शकतो.

**टोनर अशा प्रकारे चेहऱ्यावर लावा**

क्लींजर लावल्यानंतर नेहमी टोनर लावा, कारण ते वॉटर बेस्ड असते. बरेच टोनर स्प्रे स्वरूपात येतात, जे थेट चेहऱ्यावर स्प्रे केले जाऊ शकतात. काही टोनर कापसाच्या साहाय्याने लावण्यासाठी डिझाइन केलेले असतात. फक्त तुमचा चेहरा स्वच्छ करा आणि कापसाच्या मदतीने टोनर लावून पुसून टाका. नंतर चेहरा धुण्याची गरज नाही.

# Amazon Black Friday Sale मध्ये ४०% पर्यंत सूट

अमेझॉन ब्लॅक फ्रायडे सेलमध्ये नवीन फोनवर ४०% पर्यंत बंपर डिस्काउंट मिळत आहे. तुम्ही जपशझश्रींी १५, ळटजज न१०द ५G, Samsung Galaxy च१७ आणि तळींं त६०श ५ऋसारखे स्मार्टफोन परवडणाऱ्या किमतीत खरेदी करू शकता. तर या नवीन फोनवर केवळ उत्पादनांवर सवलतीच मिळत नाहीत तर अतिरिक्त बचत देखील उपलब्ध आहे. जर तुमच्याकडे ॲक्सिस बँक, बीओबी (बँक ऑफ बडोदा), एचडीएफसी किंवा आरबीएल बँक कार्ड असेल तर तुम्हाला १०% इन्स्टंट डिस्काउंटचा देखील फायदा होईल. चला तर मग आजच्या लेखात स्मार्टफोनवरील डिस्काउंटबद्दल जाणून घेऊयात.




जपशझश्रींी १५ हा नवीनतम फोन ४ हजार रुपयांनी कमी किमतीत खरेदी करण्याची ही एक उत्तम संधी आहे. जर तुम्ही हा फोन ६ महिने किंवा त्याहून अधिक कालावधीच्या HDFC बँकेच्या क्रेडिट कार्ड एचख व्यवहाराचा वापर करून खरेदी केला तर तुम्हाला ४ हजार रुपयांची त्वरित सूट मिळेल. जर तुम्ही नॉन-एचख व्यवहाराचा वापर करून पैसे दिले तर तुम्हाला ३,५०० रुपयांची सूट मिळेल.

मीडियाटेक डायमेन्सिटी ७३०० प्रोसेसरद्वारे समर्थित, या आयक्यूओ स्मार्टफोनचा ६ जीबी/१२८ जीबी व्हेरिएंट १३,९९८ रुपयांच्या सवलतीच्या किमतीत विकला जात आहे. जर तुम्ही हा फोन अमेझॉनवरून एसबीआय, अमेझॉन पे आयसीआयसीआय क्रेडिट कार्ड किंवा आयसीआयसीआय बँक कार्ड वापरून खरेदी केला तर तुम्हाला ५०० रुपयांची त्वरित सूट मिळेल.

ब्लॅक फ्रायडे सेल दरम्यान सॅमसंगचा हा बजेट स्मार्टफोन डिस्काउंटनंतर १२,४९९ रूपयांमध्ये विकला जात आहे. या किमतीत तुम्हाला ४ जीबी/१२८ जीबी स्टोरेज व्हेरिएंट मिळेल. या फोनला सहा वर्षांसाठी ओएस अपग्रेड मिळतील. या iQOO स्मार्टफोनचा ८GB/१२८GB स्टोरेज व्हेरिएंट Amazon ब्लॅक फ्रायडे सेल दरम्यान डिस्काउंटनंतर १९,४९८ रूपयांच्या किमतीत विकला जात आहे. SBI, Amazon Pay, ICICI आणि ICICI बँक डेबिट/क्रेडिट कार्ड वापरून पेमेंट केल्यास ५०० रूपयांची अतिरिक्त बचत देखील होईल. या तळीं स्मार्टफोनचा ८GB/१२८GB स्टोरेज व्हेरिएंट Amazon वर २९,९९९ च्या सवलतीच्या किमतीत विकला जात आहे. तुम्ही ICICI, -xis किंवा घेींरज्ञ बँक कार्डने पैसे देऊन अतिरिक्त २,५०० रूपये वाचवू शकता

# घरातून एलपीजीचा वास येत असेल तर या चुका अजिबात करू नका

स्वयंपाक घराची स्वच्छता राखणे, काळजी घेणे जितके महत्त्वाचे असते. तसेच स्वयंपाक घरातील वस्तुंची काळजी घेणे जेवढे गरजेचे असते तेवढीच काळजी स्वयंपाक घरातील एलपीजी सिलेंडरची घेणे गरजेचे असते. गळती आणि सिलेंडरचा स्फोट होणे हे घरांमध्ये सामान्य घटना आहेत. बऱ्याचदा लोकांना गॅसचा वास येतो, परंतू ते दुर्लक्ष करतात. तुम्हालाही तुमच्या घरात एलपीजीचा तीव्र वास येत असेल तर सावध राहा आणि तातडीने उपाय करा. जर तुमच्या घरात एलपीजीचा वास येत असेल तर तुम्ही कोणत्या चुका करू नयेत आणि काय काळजी घ्यावी हे जाणून घेऊयात.

**जर गॅसचा वास येत असेल तर सगळ्यात आधी काय करावं?**

एलपीजी सिलेंडरमध्ये इथाइल मर्केप्टन मिसळले जाते जेणेकरून गळती झाल्यास त्याचा वास लगेच ओळखता येतो. जर तुमच्या घरातून कुजलेल्या अंडी किंवा लसूणसारखा वास येऊ लागला तर ते गॅस गळतीचे संकेत असतात. अशा परिस्थितीत, बर्नर आणि रेग्युलेटरवरील सर्व नॉब ताबडतोब बंद करा. अशा वेळी बरेच लोक घाबरतात, पण यावेळी घाबरून न जाता गॅस बाहेर पडू देण्यासाठी तुमच्या घरातील सर्व खिडक्या किंवा दरवाजे उघडा.

**या गोष्टी कोणत्याही परिस्थितीत थांबवा.**

जर तुम्हाला गॅसचा वास येत असेल तर मेणबत्त्या, अगरबत्ती आणि दिवे यासारख्या जवळपास असल्यास ते ताबडतोब विझवा, लांब घेऊन जा. कधीही काडीपेटी किंवा लाईटर अशावेळी पेटवू नका. इलेक्ट्रिकल स्विच चालू किंवा बंद न करण्याची काळजी घ्या, कारण ते स्पार्क करू शकतात आणि मोठा स्फोट घडवू शकतात.

**सिलेंडर हाताळताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?**

जर गॅसचा वास येत राहिला तर रेग्युलेटर काढा आणि सिलेंडरवर सेफ्टी कॅप लावा. तसेच, लहान मुलांना आणि वृद्धांना बाहेर घेऊन जात सुरक्षित स्थळी बसवा. जर सिलेंडर बराच काळ वापरला जात नसेल तर रेग्युलेटर काढा, त्यावर कॅप घाला आणि कोरड्या जागी ठेवा.

**सिलेंडरला आग लागली तर काय करावे?**

जर गॅस गळतीमुळे सिलेंडरला आग लागली तर घाबरू नका. तुमच्याकडे काही उपाय करण्यासाठी थोडासा वेळ नक्कीच असतो. जर सिलेंडरला आग लागली तर जाड ब्लँकेट भिजवा आणि नंतर ते सिलेंडरभोवती गुंडाळा. यामुळे आग विझेल. त्यानंतर, ताबडतोब १९०६ या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करा.

## विकास विरोधी प्रवृत्ती हद्दपार करा, विकासाला साथ द्या

# शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आवाहन

## भंडारा व गोंदियामध्ये शिवसेनेच्या जाहीर सभा

**दैनिक वादळ वार्ता**
**गोंदिया । प्रतिनिधी**

शिवसेनेचा विकासाचा अजेंडा आहे. भंडारा व गोंदियाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रस्थापितांना बाहेरचा रस्ता दाखवा, अशी टीका शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केली. शिवसेनेला मत म्हणजे विकासाला मत, त्यामुळे भंडारा व गोंदियात परिवर्तनासाठी शिवसेनेच्या हाती सत्ता द्या, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे केले. भंडारा नगर परिषद व गोंदिया नगर परिषद निवडणुकीसाठी घेतलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी मंत्री आशिष जैयस्वाल, आमदार नरेंद्र भोंडेकर माजी आमदार सासराम करोटे आणि प्रमुख नेते उपस्थित होते.





गोंदिया नगराध्यक्षपदासाठी डॉ. प्रशांत कटरे यांच्यासह शिवसेनेचे ३४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गोंदिया जिल्ह्यातील नगर परिषद शिवसेना स्वबळावर लढत आहे. शिवसेनेने डॉ. कटरे यांच्या रुपात सुशिक्षित आणि सुसंस्कृत उमेदवार दिला आहे. शहरातील समस्यांचे मुळासकट निवारण करेन, असा संकल्प डॉ. कटरे यांनी केला आहे. त्यामुळे गोंदियावासीयांनी डॉ. कटरे यांच्यासह शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मतदारांना केले.

प्रस्थापितांनी इथे अनेक वर्ष सत्ता गाजवली मात्र गोंदियाची अवस्था बिकट झाली. गोंदियाच्या विकासासाठी आता परिवर्तनाची गरज आहे, कचरामुक्त गोंदिया, प्रदूषणमुक्त आणि भ्रष्टाचारमुक्त गोंदिया करण्यासाठी शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करा, असे ते म्हणाले. रामटेकसाठी २००० कोटींचा निधी दिला. गोंदियासाठी कुठेही पैसे कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. महिलांचे कष्ट जवळून बघितले आणि त्यातूनच लाडकी बहिण योजनेचा जन्म झाला, असे ते म्हणाले. धनदांडग्यांना १५०० रुपयांची काय किंमत कळणार, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर केली. याच लाडक्या बहिणींनी विधानसभा निवडणुकीत इतिहास घडवला. आतापर्यंतच्या इतिहासात महायुतीला २३२ जागा मिळाल्या. लाडक्या बहिणींची योजना कधीही बंद होणार नाही, असा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केला. ज्याच्या पाठिशी लाडक्या बहिणींची ताकद त्याचा विजय पक्का असे ते म्हणाले.

भंडारामध्ये घेतलेल्या प्रचार सभेत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की भंडारा विधानसभा मतदार संघात आमदार नरेंद्र भोंडेकर यांना ३००० कोटींचा विकास निधी दिला. आमदार भोंडेकर भंडाऱ्याच्या विकासाचे सूत्रधार आहेत. आदर्श आमदार आणि लोकप्रतिनिधी भोंडेकरसारखा असावा, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. भंडारा नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेने डॉ. अश्विनी भोंडेकर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अडीच वर्षांत मुख्यमंत्री असताना केलेल्या विकास कामांमुळे राज्याच महायुतीचे सरकार बहुमताने विजयी झाले. भंडाऱ्यात भगवा फडकवण्यासाठी एक उच्चशिक्षित नगराध्यक्ष आवश्यक आहे. डॉ. अश्विनी भोंडेकर यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. कोरोनाकाळात डॉ. अश्विनी यांनी काम केले. शिवसेनेच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने, पदाधिकारी लोकांना मदत करत होते. जिथे संकट तिथे शिवसेना हे समीकरण आहे. शिवसेनेने भंडारा नगर परिषदेसाठी एक मजबूत उमेदवारांचे पॅनल दिले आहे. या सर्व पॅनलला विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी येथील मतदारांना केले.

## शहरातील अनुराधा मिश्रा यांचा भूतानमध्ये डंका!

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहरातील अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी भूतान येथे नुकत्याच पार पडलेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. महिलांच्या विभागात त्यांनी ३५० किलो वजन उचलून विक्रमी कामगिरी करत दोन सुवर्ण पदके पटकावली. संयुक्त भारतीय खेळ फाऊंडेशनच्या (इंडू श्री ऑर्गनायझेशन) वतीने या खुल्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




भूतानची राजधानी थिंपू येथे झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आशिया खंडातील विविध देशांमधील नामांकित खेळाडू सहभागी झाले होते. प्रचंड स्पर्धात्मक वातावरणात अनुराधा मिश्रा यांनी दाखवलेले दमदार प्रदर्शन भारतीय संघासाठी अभिमानास्पद ठरले.

मिश्रा यांनी महिलांच्या सिनियर तसेच मास्टर गटात प्रत्येकी सुवर्णपदक पटकावत बाजी मारली. अत्यंत काट्याच्या स्पर्धेत ३५० किलोपर्यंत वजन उचलत त्यांनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य आणि शारीरिक सामर्थ्याची चमकदार प्रात्यक्षिके दिली. त्यांच्या या ऐतिहासिक यशामुळे त्यांची जागतिक चॅम्पियनशिपसाठी निवड देखील झाली आहे.

या चमकदार कामगिरीमागे महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे आणि राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. अनुराधा मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकरमध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या देखरेखीखाली सराव करतात. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या जोरावर त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराचा झेंडा उंचावला आहे. मिश्रा यांना स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र हा किताबही मिळाला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अनुराधा मिश्रा यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## भाजप मध्य मंडळाच्या वतीने वृक्षारोपणातून हरीत अहिल्यानगरचा संकल्प

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी मध्य मंडळाच्या वतीने शहरातील सिद्धीबाग परिसरात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आला. हरीत शहर सुरक्षित भविष्य या संकल्पनेला अनुसरून महिला व भगिनींच्या हस्ते आंब्याच्या रोपांची लागवड करण्यात आली. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा उपक्रम शहरात उत्साहात पार पडला.



भाजप मध्य मंडळाच्या चिटणीस सोनाली पाठक, हर्षदा पवार, हौसाबाई गोंधळे, आरती सकट, प्रिशा साळवे आदी महिलांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तर लावलेल्या झाडाच्या संवर्धनाची देखील जबाबदारी घेण्यात आली. या वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन माजी मध्य मंडळाध्यक्ष अशोक भोसले व मध्य मंडळाध्यक्ष सुनिल सकट यांच्या पुढाकारातून करण्यात आले. या कार्यक्रमाला शालेय शिक्षक राहुल जाधव, संतोष शिरसाठ, लखन साळवे, गौरव पाचबैल, संतोष साळवे, श्लोक पवार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

सुनिल सकट म्हणाले की, डॉ. सुजय विखे हे जनतेच्या मनातील लोकप्रिय नेतृत्व आहे. खासदार म्हणून त्यांनी शहर व जिल्ह्याच्या विकासासाठी उल्लेखनीय काम केले. त्यांनी शिक्षण व आरोग्य सेवांचा विस्तार केला असून ग्रामीण भागात अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि वैद्यकीय शिक्षण संस्था उभारून मानव संसाधन विकासासाठी भरीव योगदान दिले. त्यांच्या प्रेरणेने आम्ही वृक्षारोपणाचा संकल्प केला असून 'हरीत शहर सुंदर शहर' हा उद्देश आम्ही सर्व मिळून पूर्ण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक भोसले म्हणाले की, डॉ. सुजय विखे यांनी 'जनसेवा युवा मंच'च्या माध्यमातून जिल्ह्यातील सामाजिक आणि विकासात्मक उपक्रमांना चालना दिली आहे. शहराचा विकास, रस्त्यांची उभारणी, शैक्षणिक सुविधा व सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याच प्रेरणेने आज आम्ही सिद्धीबागेत वृक्षारोपण केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या उपक्रमामुळे सिद्धीबाग परिसरात हिरवाईची वाढ होणार असून, पुढील काळात शहराला पर्यावरणपूरक बनवण्याचा निश्चय भाजपच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# अहिल्यानगरात मानव-बिबट संघर्ष रोखण्यासाठी प्रशासनाकडून व्यापक उपाययोजना

## पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून दैनंदिन आढावा

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर वनविभागातील वाढत्या मानव - बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासन व वन विभागामार्फत अल्पकालीन तसेच दीर्घकालीन स्तरांवर सर्वसमावेशक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या उपाययोजनांचा पालकमंत्री दररोज दूरध्वनीद्वारे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्याकडून आढावा घेत आहेत.अहिल्यानगर वनविभागात सुमारे १ हजार १५० बिबट्यांची अंदाजित संख्या असून ऊस, मका, नेपिअर गवत, फळबागांचे क्षेत्र व पाण्याची उपलब्धता यामुळे बिबट्यांचा अधिवास मानवी वस्तीजवळ निर्माण होत आहे. परिणामी संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रशासनाने तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली आहे.

बिबट्यांना तात्काळ जेरबंद करण्यासाठी राहुरी व संगमनेर येथे दोन प्रशिक्षित रेस्क्यू टीम तैनात आहेत. अलीकडील काळात मानवावर हल्ला करणाऱ्या २३ बिबट्यांना पकडून सुरक्षित स्थळी ठेवण्यात आले आहे. खारे-करजुने परिसरातील दोन बिबट्यांना जेरबंद करून त्यांना माणिकडोह (ता. जुन्नर) येथील निवारा केंद्रात कायमस्वरूपाने ठेवण्यात आले आहे. तसेच कोपरगाव तालुक्यातील येसगाव-टाकळी परिसरातील नरभक्षक ठरलेल्या एका बिबट्याला १५ नोव्हेंबर २०२५ रोजी गोळी झाडून ठार करण्यात आले.पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार जिल्हा नियोजनातून निधी उपलब्ध करून देण्यात आला असून या निधीतून ३०० पिंजरे, ३०० ट्रॅप-कॅमेरे, रेस्क्यू उपकरणे (जॅकेट, शूज, टॉर्च-गन, संरक्षणात्मक किट) आणि १४ रेस्क्यू वाहने खरेदी करण्यात आली आहेत. ट्रॅप-कॅमेऱ्यांद्वारे बिबट्यांच्या हालचालींची नोंद दैनंदिन घेतली जाते. संवेदनशील रस्त्यालगतचा झाडोरा हटवून रस्ते मोकळे करण्यात आले आहेत.

वनविभागाने वारंवार घटना घडणारी ८९७ संवेदनशील गावे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कळविली असून त्यानुसार या गावांतील शाळांची वेळ बदलून सकाळी ९.३० ते सायंकाळी ४.०० अशी निश्चित करण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पहाटे किंवा उशिरा सायंकाळी प्रवास करावा लागू नये.सध्या वनविभागाकडे ३०५ पिंजरे आणि ३ थर्मल ड्रोन उपलब्ध असून प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून त्यांचा वापर करण्यात येतो. राहुरी वनपरिक्षेत्रातील बारागाव नांदुर येथे वन्यप्राणी उपचार केंद्र (Transit Treatment Centre - फेज १) उभारणी अंतिम टप्प्यात असून जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण क्षमतेने सुरू होईल.

## पाथरूड येथे उमेद च्या महिला प्रभाग संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**भूम । प्रतिनिधी**

दिनांक २५ नोव्हेंबर,वार मंगळवार रोजी भूम तालुक्यातील पाथरूड येथे उमेद च्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (ग्रामविकास व पंचायत राज विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या नूतन जिजामाता महिला प्रभाग संघ याच्या कार्यालयाचा शुभारंभ प्रमुख पाहुण्याच्या हस्ते संपन्न झाला. ग्रामीण भागातील सर्वांगीण विकास साधत असताना उमेदच्या माध्यमातून बचत गट व तसेच इतर अभिनव उपक्रम सातत्याने राबविले जातात, गावातील कुटुंबातील प्रत्येक महिला सक्षम व्हावी, आर्थिक सुधारणा आपल्या स्वतःच्या व्यवसायातून करता यावी या हेतूने उमेद आजपर्यंत कार्य करत आलेली आहे निश्चितपणे येणाऱ्या कालावधीमध्ये आणखीन मोठे उद्योग आपल्या परिसरात उभारून गावाचे




व परिसराचे नावलौकिक वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सर्वजण मिळून करतील असे मत डॉ.चेतन बोराडे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ चेतन बोराडे यांच्यासह जिजामाता महिला प्रभाग संघाच्या अध्यक्ष अश्विनी शहाजी आठवले, युवा उद्योजक भाऊसाहेब बोराडे,व्यापारी संघाचे अण्णासाहेब पवार,पांडुरंग जाधव, तालुका व्यवस्थापक मनोज जी कवडे, सी एल एफ अकाउंटेड रेश्मा अडसूळ,ग्रामपंचायत कर्मचारी विलासजी जाधव यांच्यासह सर्व गटप्रवर्तक (सीआरपी), ग्राम संघ पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाळुंगी येथे जि.प.प्राथमिक मराठी शाळा माकडांच्या धुमाकूळाने विद्यार्थी व नागरिक त्रस्त

**दैनिक वादळ वार्ता**
**आर्णी । प्रतिनिधी**

आर्णी:दि २६ नोव्हेंबर तालुक्यातील महाळुंगी गावात माकडांनी धुमाकूळ घातला आहे यातील माकडे महीला व लहान मुलवर हल्लाचढवीत असुन जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही दहशतीचे वातावरण पसरले आहे परंतु वनविभाग याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असुन. एखाद्याव्यक्तीचा यामध्ये जीव गेल्यावर यांना जाग येणार का असा संतप्तसवाल गावकरी करीत आहेत.




गावातील झाडावर जि. प. शाळेवर व घरा वर माकडांचे साम्राज्यसातत्याने वाढत असून मागील १५ दिवसा पासून गावात ५० च्या वर माकडे आहेत, लहानमुले, महीला, वृद्ध घराबाहेर पडायला घाबरत आहेत कधीहल्ला करतील हे सांगता येत नाही की तेक घरावरील टीन आहे...

गावात माकडांच्या दहशतीने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण.

पत्रेमाकडांच्या धुमाकूळाने चाळणी चाळणी झाले आहेत मागील १५ दिवसापासून यांचा गावा मुक्काम असल्याने माणसालाआता भीत नाहीत माकडांची दहशत इतकी वाढली की सरळघरात शीरुन खाण्याच्या वस्तु लंपास करीत आहे अनेक वेळामाकडांनी लहान मुलांवर व महीलेवर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही वनविभागाने याची दखल घेऊन माकडाना पकडण्यासाठी त्वरित पुढाकार घेणे गरजेचे आहे. अन्यथा माकडांच्या दहशतीत वावरताना जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही वनविभाग याकडे लक्ष देणे गरजेचे आहे असा प्रतिक्रिया महाळुंगी गावकरी व्यक्त करीत आहे माकडांना जंगलात पिटाळूनलावावे आणि होणारा त्रास व हानी थांबवावी अशी मागणी महाळुंगी येथील नागरीककरीत आहे...

# बिबट्यासारख्या संवेदनशील प्रसंगी तात्काळ प्रतिसादासाठी तळोदा वन विभागाचे प्रभावी प्रात्यक्षिक: मनुष्य-वन्यजीव संघर्ष नियंत्रणाची सिद्धता

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

मानव-वन्यजीव संघर्षाच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे संरक्षण सुनिश्चित करणे आणि वन्यजीवांचे सुरक्षित पुनर्वसन करणे, या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडण्यासाठी त्वरित कृती दलाची तयारी किती महत्त्वाची आहे, हे तळोदा वनविभागाने दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या प्रात्यक्षिकातून सिद्ध केले.

तळोदा वनविभागाने बिबट्यासारख्या संवेदनशील वन्यजीव संकटात कसा प्रभावी आणि तातडीचा प्रतिसाद द्यावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आयोजित केले. बिबट्या शहरात, गावात शिरल्यास किंवा एखाद्या निवासी घरात अडकल्यास निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचा सराव यातून करण्यात आला.

वनविभागाचा मुख्य उद्देश, अशा घटनांमध्ये जीवितहानी टाळून वन्यजीवाचे सुरक्षित रेस्क्यू आणि पुनर्वसन करणे, तसेच जमाव नियंत्रणाद्वारे घटनास्थळी शांतता राखणे हा होता.या प्रात्यक्षिकादरम्यान शीघ्र कृती दलाने अत्यंत सावधगिरी, कौशल्य आणि वन्यजीव संरक्षण नियमांचे काटेकोर पालन करत बिबट्याला सुरक्षितरीत्या पकडण्याची प्रक्रिया पार पाडली. सरावामध्ये खालील महत्त्वाच्या बाबींचा समावेश होता.

ज्यामध्ये परिसरातील नागरिकांना त्वरित सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांचे रक्षण करणे., बिबट्याला जाळे टाकून नियंत्रित करणे आणि सुरक्षित अंतर राखत त्याला गोंधळात पाडणाऱ्या 'दिशाभूल तंत्रा'चा वापर करणे., आवश्यकता भासल्यास प्राण्याला तात्पुरते बेशुद्ध करण्यासाठी ट्रँक्विलायझिंग इंजेक्शन देण्याची प्रक्रिया.,अचानक जमलेल्या जमावावर नियंत्रण मिळवून बचाव कार्यात कोणताही अडथळा येणार नाही, याची काळजी घेणे आणि विविध विभागांमध्ये उत्तम समन्वय साधणे. वनविभागाचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यामध्ये सहाय्यक वनसंरक्षक अमोल आडे, वनपरिक्षेत्र अधिकारी तळोदा शंतनू सोनवणे, परी. वनपरिक्षेत्र अधिकारी सीमा शेख, राजेश अंधारे आणि पांडुरंग बेरगडे यांचा समावेश होता. तळोदा त्वरित कृती दला मधील गिरधर पावरा, नामदेव डोंगरे, आशुतोष पावरा, राहुल कोकणी, महेंद्र तडवी, वीरसिंघ पावरा, अमर वसावे, संदीप भंडारी आणि दीपक बालदे यांनी प्रत्यक्ष बचावाच्या कृतीत सक्रिय सहभाग नोंदवला.

**वनविभागाचा हा उपक्रम प्रशंसनीय ठरला असून, या तयारीमुळे आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाची प्रतिसादक्षमता अधिक सक्षम होणार आहे. भविष्यात अशा संवेदनशील परिस्थितीत अधिक कौशल्यपूर्ण आणि वेगवान प्रतिसाद देण्यासाठी ही तयारी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**



## डॉ.आंबेडकरांनी देशाला जगातील सर्वात सर्व समावेशक संविधान दिले- डॉ.वसुदेव गायकवाड



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय संविधानाचे अमृतमहोत्सवी वर्ष तथा भारतीय संविधान दिन भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन,ग्रंथ प्रदर्शन,व्याख्यान, कथाकथन इत्यादी सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम घेण्यात आले.

सर्व प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान उद्देशिका प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले.त्यानंतर भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड,जयंत सौदागर यांनी केले.ग्रंथवाचन यशवंत सौदागर,अक्षरा सौदागर,बबन पुंड,आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्ष या विषयावर ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वात सर्वसमावेशक संविधान भारत देशाला देवून स्वातंत्र्य,समता, बंधुता व सामजिक न्याय दिला असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.अध्यक्षस्थानी ह.भ.प.नारायण भाऊ गायकवाड हे होते. सकाळी ९ ते ५ पर्यंत ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले.

## मोबाईल मुळे आजच्या तरुण पिढीचा यांचा नात्यातील संवाद हरवला आहे-अॅड.कराड



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथील साने गुरुजी निवासी प्राथमिक, माध्यमिक,उच्चमाध्यमिक विद्यालय,नरेंद्रजी मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्था येथील तरुण युवा युवतींना समुपदेशन कार्यक्रम घेण्यात आला होता.याप्रसंगी व्यासपीठा वर मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड यांनी सांगितले की,आजच्या तरुण पिढीचा व पुर्वीच्या पिढीमधील फरक सांगितला की,आज तुम्ही जो मोबाईल पाहता त्यात तुम्हाला मागेल ते भेटते पण आमच्या काळात दुरदर्शन असायचे त्यावर आम्ही समाधानी होतो पण आज तुम्हाला एवढे मोठे साधन इंटरनेट, मोबाईल मिळाला आहे पण तुम्ही अनावश्यक त्या मधुन घेता.आजच्या तरुण पिढीचा संवाद संपला आहे.आजचा तरुण एकल कोंडा झाला आहे असे सांगितले.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून संकुलाच्या प्राचार्या डॉ. कविता गित्ते-कराड मॅडम यांनी पण मुलांना मनोगत व्यक्त करताना सांगितले की,वाढत्या वया मध्ये मुलांमध्ये होणारे बदल शारीरिक,मानसिक, भावनिक बदल या विषयी मुलांना सविस्तरमार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती वडमारे मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाला श्री.पवार सर,दस्तुरे सर यांची उपस्थिती होती.

## अंबाजोगाई येथे पतसंस्था संचालक व कर्मचारी यांच्यासाठी दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म. पुणे चे सरकार प्रशिक्षण केंद्र लातूर जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड व योगेश्वरी महाविद्यालय कर्मचारी सहकारी संस्था मर्यादित अंबाजोगाई यांचे संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई तालुक्यातील नागरी, ग्रामीण बिगर शेती, पगारदार सहकारी पतसंस्था संचालक, कर्मचारी यांना दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन श्री. बी.के.मसने सर व प्रमुख पाहुणे म्हणून सचिव श्री. आर एम साळवी सर यांची उपस्थिती होती.तर प्रमुख विशेष उपस्थिती सहकार अधिकारी श्री. विलास मोरे साहेब, व्याख्याते सहकार तज्ञ श्री खोडसे सी.ए



प्रमाणित लेखापरीक्षक उपस्थित होते.उद्घाटन प्रसंगी सहकार अधिकारी श्री. मोरे साहेब यांनी वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकान्वये संस्थेने कामकाज व सदर परिपत्रकांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने सहकारी पतसंस्थेतील कर्मचारी, संचालक यांनी वेळोवेळी सहकार प्रशिक्षण घेणे काळाची गरज आहे असा पतसंस्थेतील कर्मचारी व संचालकांना सल्ला दिला. दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात पहिल्या दिवशी सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य श्री.एस.आर.कोळे यांनी सहकार कायदा नियम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच सहकार तज्ञ अभ्यासू बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध सहकार व्याख्याते श्री. खोडसे सी.ए प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांनी ठेवी सुरक्षितता,कर्ज वितरण करतअसताना घ्यावयाची दक्षता,एनपीए,थकबाकी, थकबाकीदारावर १०१ची कायदेशीर कारवाई, ऑडिट संदर्भात व भविष्यात हे विधान व संस्था अडचणीत येणार नाहीत याविषयी सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच दुसऱ्या दिवशी वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेचे सीईओ श्री.जयप्रकाश जी शर्मा यांनी सहकार विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेचे कोषाध्यक्ष श्री. शिवहार ढगे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन,आभार प्रदर्शन वर्ग संयोजक श्री. आर एस कोळे लातूर यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी पार पाडण्यास योगेश्वरी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित अंबाजोगाई यांच्या कर्मचारी व संचालक यांनी सहकार्य केले.

## केज तालुक्यात कीड आळ्यांचे निकृष्ट धान्य वितरित; वंचित बहुजन आघाडीची कारवाईची मागणी



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विविध राशन दुकानांमध्ये नागरिकांना मिळणाऱ्या ज्वारीच्या धान्यात मोठ्या प्रमाणात किड,अळ्या व जाळी आढळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्रनाराजी निर्माण झाली आहे.या गंभीर गैर प्रकाराविरोधात वंचित बहुजन आघाडी च्या वतीने दि.२६ नोव्हेंबर रोजी तहसीलदार केज यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले की, शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत मिळणारे ज्वारीचे धान्य अत्यंत निकृष्ट,अस्वच्छ व आरोग्यास हानिकारक स्वरूपाचे आहे.अशा निकृष्ट धान्याचे वितरण हा ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणारा गंभीर प्रकार असून तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.हे निवेदन लिंबराज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात सादर करण्यात आले.यावेळी तालुका प्रवक्ते प्रदीप गायकवाड,सतीश बनसोडे,भैय्यासाहेब आरकडे,दत्ता गायकवाड, पांडुरंग जोगदंड आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रकरणात तातडीने समाधानकारक कारवाई न झाल्यास वंचित बहुजन आघाडीतीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

## मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी. एक्स मार्फत बचत गटातील महिलांना निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न



दैनिक वादळ वाता

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी तांदळवाडी तालुका धारूर येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून बचत गटातील महिलांना एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन सौ. अनिता पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित महिलांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी महिलांना बचत,आर्थिक नियोजन व त्याचे महत्त्व, डिमॅट अकाउंट, फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज (सोने,चांदी) यांची मागणी व येणाऱ्या काळात त्यात होणाऱ्या भाव वाढीचे बदल,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट,कमोडिटी वइक्विटी मध्ये असलेला फरक, तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व इत्यादीचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना महिलांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी सौ.मोहर भिसेमॅडम

यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले तर सूत्रसंचालन सौ. निर्मला साखरे मॅडम यांनी केले.तसेच याकार्यक्रमास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मी केलेला विकास हा केवळ जनतेच्या आशिर्वादामुळेच-आ.संजय बनसोडे

दैनिक वादळ वार्ता

**उदगीर । प्रतिनिधी**

माझ्या मंत्री व आमदारकीच्या काळात उदगीर शहराच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढून शहराला भौतिक सुविधे बरोबरच सांस्कृतिक मेजवानी देऊन उदगीर शहराचे नाव जगाच्या नकाशावर आणले. ते केवळ उदगीर मतदार संघातील जनतेने दिलेल्या मतदान रुपी आशिर्वादामुळेच, म्हणून या विकासाचे श्रेय हे माझ्या जनतेचे असल्याचे मत माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर नगर परिषद निवडणूक २०२५ च्या प्रभाग १२, १३ व १४ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजीत प्रचार सभेत बोलत होते.



यावेळी माजी आ.गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. सदस्य राहुल केंद्रे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.स्वाती सचिन हुडे, माजी नगरसेवक सचिन हुडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, अमोल निडवदे, उमेदवार सौ.विद्या बुंदे, साईनाथ चिमेगावे, नरसिंग शिंदे, शितल शिंदे, अनिल मुदाळे, मनकर्णा मुदाळे, आनंद बुंदे,अमरनाथ सुर्यवंशी, वसंत पाटील, भाजपाचे शहराध्यक्ष अमोल अनकले, डॉ.प्रकाश येरमे, प्रा.श्याम डावळे, आदी उपस्थित होते.पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, उदगीर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभाग १२, प्रभाग १३, प्रभाग १४ येथील युतीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या. असे आवाहन करून येत्या काळात उदगीर शहराला स्मार्ट सिटी करून महाराष्ट्रात एक नंबरची नगरपालिका म्हणून नावलौकिक वाढवणार असल्याचे सांगितले. शहरातील मूलभूत सुविधे बरोबरच विविध आरोग्याच्या सोयी सिटी बस, अभ्यासिका केंद्र उभारणार असून केंद्र शासन व राज्य शासनाचा निधी खेचून आणून उदगीरचा कायापालट करणार असल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या युती पक्षाच्या शहरातील सर्व उमेदवार व नगराध्यक्ष यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केले. यावेळी प्रभागातील नागरीक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077